## प्रकरण सहावे

# उपसंहार

उस्मानाबाद जिल्ह्यातील शेतकरी कामगार पक्षः एक अभ्यास हा विषय संशोधनासाठी निवडत असताना उस्मानाबाद जिल्ह्यातील शेतकरी कामगार पक्षाने राजकीय, सामाजिक योगदानाचा सर्वांगिण अभ्यास व्हावा. तसेच यापूर्वी भोळे भा.ल.यांनी शे.का.पक्षावर स्वातंत्र्य ते संयुक्त महाराष्ट्रापर्यंत अभ्यास केला होता. त्यानंतरच्या कालखंडाचा अभ्यास झालेला नसल्याने उस्मानाबाद जिल्ह्यातील शे.का.पक्षाचा सर्वांगिण अभ्यास व्हावा. मराठवाड्यात शे.का.पक्षाची स्थापना उस्मानाबाद जिल्ह्यात झाली होती. त्याचे महत्व उस्मानाबाद जिल्ह्यातील शे.का.पक्षाला जाते. त्यातून श्रमजीवींच्या बाबतीत जिल्ह्यातील शे.का.पक्षाची तळमळ स्पष्ट होते. म्हणून जिल्ह्यातील शे.का.पक्षाने श्रमजीवी जनतेच्या चळवळीच्या कार्याची प्रचिती, पध्दती, संपूर्ण जनतेला समजावी.उस्मानाबाद जिल्ह्याला कौशल्यपूर्ण उध्दवराव पाटलांच्या नेतृत्वाचा अभ्यास व्हावा. उस्मानाबाद जिल्ह्यातील पक्षाचे कार्य व उध्दवरावांचे नेतृत्व आधुनिक काळामध्ये आदर्श ,मार्गदर्शक ठरणारे आहे. उस्मानाबाद जिल्ह्यातील शे.का.पक्षाच्या व अन्य पक्षाच्या नवीन पिढीतील कार्यकर्त्यांना,तरूण वर्गाला, सामाजिक कार्यकर्त्यांना, पक्षाच्या कार्याचा व उध्दवरावांच्या नेतृत्वापासून प्रेरणा मिळावी या उद्देशाने निबंधात मांडणी केली आहे.

१९८० पर्यंत कालखंड निवडण्याचे कारण म्हणजे उध्दवराव पाटलांच्या नेतृत्वाचा प्रभाव जिल्ह्यातील शे.का.पक्षावर या कालखंडापर्यंत होता. म्हणून १९८० पर्यंत कालखंड अभ्यासासाठी निवडला.

या शोध प्रबंधाचा अभ्यास करताना पुढील उद्देश सामान्यपणे निश्चित करण्यात आले.

१. शेतकरी कामगार पक्षाचा उदय नेमका कोणत्या कारणातून झाला.

२. मराठवाड्यात तथा उस्मानाबाद जिल्ह्यात शे.का.पक्ष स्थापनेपूर्वीची सामाजिक,राजकीय, शैक्षणिक परिस्थिती निजाम राजवटीत कशी होती व या परिस्थितीचा परिणाम. सत्यशोधक समाजाच्या चळवळीचा वारसा घेऊन आलेल्या शे.का.पक्षाच्या नेतृत्वावर कसा परिणाम झाला.

३ उस्मानाबाद जिल्ह्यात मराठवाडा विभागपातळीवरची शे.का.पक्षाची स्थापना करण्यात आली होती.मराठवाड्यात शे.का.पक्षाची स्थापना करण्यात उस्मानाबाद जिल्ह्यातील नेतृत्वाचा प्रभाव अधिक होता हा या अभ्यासाचा हेतू होता

४. मराठवाड्यात व उस्मानाबाद जिल्ह्यात शे.का.प.ने श्रमजीवी जनतेसाठी चालविलेल्या चळवळीचा अभ्यास

५. उध्दवराव पाटलांच्या रुपाने भा.शे.का.पक्षाला मिळालेल्या नेतृत्वाचा आणि कार्याचा अभ्यास.

६. १९५२ ते १९८० पर्यंतच्या कालखंडात मराठवाड्यात व उस्मानाबाद जिल्ह्यात शे.का.प.पक्षाला निवडणुकीद्वारे मिळालेले यश,अपयश यांच्या कारणमीमांसाचा अभ्यास.

वरील उद्देश डोळयासमोर ठेवून हा शोधनिबंध पूर्ण करण्यासाठी ऐतिहासिक पध्दतीचा व वर्णनात्मक संशोधन पध्दतीचा वापर केला. या पध्दतीत ऐतहासिक कागदपत्रे, वृत्तपत्रे, शे.का.पक्षाची मासिके, साप्ताहिक स्मरणिका, विशेषांक, शे.का.पक्षाच्या अधिवेशनातील ठराव, प्रत्यक्ष मुलाखती, ध्वनीमुद्रांकीत भाषणे, अप्रकाशित शोधनिबंध, शे.का.पक्षाच्या नेत्यांचे लेख, नेत्याची विधानसभेतील भाषणे या साधनांचा वापर केलेला आहे. ग्रंथालयाचा आधार या अभ्यासास प्रमुख आहे.

उस्मानाबाद जिल्ह्यातील शेतकरी कामगार पक्ष : एक अभ्यास या शोधनिबंधाच्या पहिल्या प्रकरणामध्ये भारतीय शेतकरी कामगार पक्षाच्या स्थापनेपूर्वीची पार्श्वभुमी आणि भा.शे.का.पक्षाची स्थापना याचा अभ्यास केला आहे. १९१७ साली भारतमंत्री मॉटेग्यु साहेबांनी इंग्रज भारतीयांना कोणत्या सुधारणा बहाल करणार आहे याचा जाहीरनामा प्रसिध्द केला. आणि त्यामुळे शिक्षणात मागासलेल्या वर्गाच्या म्हणजे ब्राम्हणत्तेरांचा पक्ष जन्मास आला. या चळवळीचे स्वरूप ब्राम्हणत्तेरांची चळवळ असेच होते. या चळवळीचा रोख सावकारशाही, भिक्षूकशाही व साम्राज्यशाही या विरुध्द होता. दारिद्रियाचा संदेश झोपडीपर्यंत पोहचवणाऱ्या गांधीजीच्या नेतृत्वाखाली कॉंग्रेसने महाराष्ट्रातील बहुसंख्याक असणारा किसान कामगारांचा वर्ग संघटित झाला. त्यामुळे कॉंग्रेस संघटना बळकट झाली होती. कॉंग्रेसअंतर्गत ब्राम्हणत्तेरांना वागणूक कशी मिळाली याचा अभ्यास शोधनिबंधात केला आहे.

ब्राम्हण–ब्राम्हणत्तेरांच्या चळवळीतून आणि स्वातंत्र्यप्राप्तीनंतर कॉंग्रेसने स्वीकारलेल्या भांडवलधार्जिण्या धोरणामुळे शे.का.प.चा जन्म झाला. कॉंग्रेसचे स्वातंत्र्यापूर्वी व स्वातंत्र्यप्राप्तीनंतरचे स्वरूप कसे होते.कॉंग्रेसमधून डाव्यांना कसे हुसकावले.

शे.का.प.च्या उदयाची कारणे कोणती होती. आणि शे.का.पक्षावर स्थापनेनंतर कोणते आरोप विरोधकांकडून झाले. याचा अभ्यास पहिल्या प्रकरणात केला आहे.

शोध निबंधाच्या दुसऱ्या प्रकरणामध्ये भारतीय शेतकरी कामगार पक्षाने स्वीकारलेल्या वैचारिक आधाराचा अभ्यास केला आहे. शेतकरी कामगार पक्षाच्या उदयानंतर निश्चित ध्येय धोरणासाठी भरलेल्या दाभाडी अधिवेशनात आपली वैचारिक भुमिका स्वीकारली. शेतकरी, कामगार,शेतमजुरांचे राज्य निर्माण करण्यासाठी आणि भांडवलशाही उखडून टाकण्यासाठी पक्षाने स्वीकारलेल्या मार्क्स-लेनिनवादाच्या भूमिकेचा अभ्यास शोधनिबंधांच्या दुसऱ्या प्रकरणात केला आहे.

मराठवाडा व मराठवाड्यातील शेतकरी कामगार पक्ष या तिसऱ्या प्रकरणात शे.का.प.स्थापनेपूर्वी ऐतिहासिक,सामाजिक,राजकीय परिस्थितीचा अभ्यास केला आहे. हैद्राबाद संस्थानावरील शेवटच्या निजाम राजवटीत बहुजन समाजावर निजामाने अन्वनित अत्याचार केले होते. निजाम राजवटीने सरंजामशाही, जमीनदारांना अप्रत्यक्षरित्या पोसल्यामुळे व त्यांचे प्रमाण मोठे असल्याने सर्वसामान्य शेतकऱ्यांची, शेतमजुरांची परिस्थिती अत्यंत हालाखीची होती. अल्पसंख्याक जमातीची राजवट असली तरी संख्येने बहुसंख्याक असणाऱ्या हिंदूची स्थिती अतिशय शोचनीय होती. या परिस्थितीतून जनतेला संघटित करण्याचे प्रयत्न स्टेट कॉंग्रेच्या नेतृत्वाखाली अनेक विचारांनी केले. स्टेट कॉंग्रेस अंतर्गतच असणाऱ्या प्रथम मराठा व तत्सम वर्गीय शिक्षण परिषदेच्या नंतर शेतकरी संघाच्या माध्यमातून केलेले कार्य महत्वपूर्ण आहे. शेतकरी संघाच्या माध्यमातून केलेले कार्य महत्त्वपूर्ण आहे. शेतकरी संघाच्या स्टेट कॉंग्रेसच्या उच्चवर्गीयांकडून वागणूक व्यवस्थित न मिळाल्याने व शेतकरी संघाला स्टेट कॉंग्रेस अंतर्गत राहून कार्यरत राहण्यास मान्यता न मिळाल्याने शेतकरी संघाचे रुपांतर शे.का.प.मध्ये झाले. याचा चिकित्सक पध्दतीने अभ्यास केला आहे.

मराठवाड्यात शे.का.प.च्या स्थापनेनंतर सामाजिक, राजकीय, शैक्षणिक परिस्थितीतून निर्माण होणाऱ्या प्रश्नातून चळवळी पक्षाने कशा उभा केल्या. चळवळीस नेतृत्व कोणाचे लाभले. आणि १९५२ ते १९८० पर्यंतच्या निवडणुकीमध्ये शे.का.प.चे मराठवाड्यातील स्थान कसे होते. हा अभ्यास शोध निबंधाच्या तिसऱ्या प्रकरणात केला आहे.

चौथ्या प्रकरणामध्ये उस्मानाबाद व कै. उध्दवराव पाटलांच्या कार्याचा अभ्यास केला आहे. मराठवाड्यात शे.का.प.ची स्थापना करण्यात उस्मानाबाद जिल्ह्यातील उध्दवराव पाटलांचा वाटा महत्त्वपूर्ण होता. उस्मानाबाद जिल्ह्यात स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्यानंतरच्या कालखंडात ज्या सामाजिक राजकीय चळवळी झाल्या त्या चळवळीमध्ये कार्य करण्यात व चळवळीस दिशा देणाऱ्या नेत्यापैकी उध्दवराव पाटील हे एक प्रमुख सेनानी होते.

हैद्राबाद संस्थानातील अन्यायी निजाम राजवटीतील त्यांचे कार्य महत्त्वपूर्ण होते. शेतकरी संघाच्या सैनिकी कॅम्पमध्ये तरुणांना प्रोत्साहन देण्यात, प्रशिक्षण वर्ग चालवण्यात व प्रत्यक्ष लढ्यात त्यांचे कार्य उल्लेखनीय आहे. उस्मानाबाद जिल्ह्यातील सावकार विरुध्दचा लढा, जुलमी लेव्ही वसुली विरुध्दचा लढा, संयुक्त महाराष्ट्र सीमा समितीला मिळालेले त्यांचे नेतृत्त्व, विनोबांच्या भुदान विरुध्दचे त्यांचे आंदोलन, कुळयांना जमीनी मिळवून देण्यासाठीचा त्यांचा लढा. उस्मानाबाद जिल्ह्यातीलच श्रमजीवींसाठी विधानसभेत त्यांनी उठवलेला आवाज इ. त्यांच्या चळवळीचा व त्यांनी लढवलेल्या निवडणूकीचा अभ्यास शोधनिबंधाच्या चौथ्या प्रकरणात केलेला आहे.

शोध निबंधातील पाचव्या प्रकरणामध्ये उस्मानाबाद जिल्ह्यातील शेतकरी कामगार पक्षाचा अभ्यास केला आहे. मराठवाड्यावरील निजामी राजवटीतील अन्यायकारक राजकीय, सामाजिक, शैक्षणिक परिस्थिती विरुध्द राजकीय जागृती निर्माण करण्यात मराठा व तत्सम वर्गीय शिक्षण परिषदे आणि त्यातून निर्माण झालेल्या शेतकरी संघामार्फत लढा देण्यात उस्मानाबाद जिल्ह्यातील नेतृत्त्व आघाडीवर होते. शेतकरी संघाने उभारलेल्या सैनिकी कॅम्पद्वारे नागरिकांना सरंक्षण देण्याचे काम जिल्ह्यातील नेतृत्त्वाने केले.त्याप्रमाणे मराठवाड्यात शेतकरी कामगार पक्ष स्थापन करण्यात उस्मानाबाद जिल्ह्यातील नेतृत्त्व आघाडीवर होते. आणि मराठवाड्यात शेतकरी कामगार पक्षाची स्थापना उस्मानाबाद जिल्ह्यातून झालेली होती. त्यामुळे त्याचा परिणाम उस्मानाबाद जिल्ह्यातील कार्यकर्त्यांवर, जनतेवर झाल्याने सुरवातीच्या काळात जिल्ह्यात शेतकरी कामगार पक्ष कॉंग्रेसच्या विरुध्द खंबीरपणे उभा राहिला.

जिल्ह्यातील शे.का.प.चा जमीनदार, सरंजामदार पध्दती मोडीत काढण्यात महत्त्वाचा वाटा आहे. द्विभाषिक राज्याविरुध्दचा लढा, गोवामुक्ती आंदोलन, मुंबईसह

संयुक्त महाराष्ट्राचा लढा, शेतीला किफायतशीर भावासाठीचा लढा, शेतमजुरांसाठी मजुरांच्या प्रश्नाचा लढा, १९७२ च्या दुष्काळी परिस्थितीविरुध्द लढा इ. अनेक लढ्यातून सर्वसामान्य नागरिकांना, श्रमजीवी जनतेला न्याय मिळवून देण्यात शे.का.पक्षाचा महत्त्वपूर्ण वाटा होता

शे.का.प ला. जिल्ह्यातील निवडणुकीद्वारे मिळालेल्या स्थानाचे मोजमाप, नेतृत्त्वाचा अभ्यास करण्याचा प्रयत्न या शोधनिबंधात केला आहे.

महाराष्ट्र पातळीवर व उस्मानाबाद जिल्ह्यात शे.का.प.ची वाटचाल सुरवातीच्या काळात खंबीरपणे झालेली होती. त्यांनी चालवलेल्या श्रमजीवींच्या चळवळीचे कार्य महत्वपूर्ण आहे. पक्ष महत्वपूर्ण विरोधकांची भूमिका बजावत आला. १९५४-५५ मध्ये पक्षातून प्रमुख मंडळीच्या वादामुळे महत्वपूर्ण पुढारी पक्षातून बाहेर पडले. यामुळे या बेभरवशाच्या पुढाऱ्यामुळे पक्ष कोलमडून पडला. आणि पक्षाच्या नेतृत्त्वाची जबाबदारी दुसऱ्या फळीतील नेतृत्त्वावर पडली. त्यांनी पक्ष खंबीरपणे उभा करण्याचा प्रयत्न केला परंतु काही भागापुरताचा मर्यादित पक्ष अस्तित्त्वात राहिला.उस्मानाबाद परभणी जिल्ह्यात अनुक्रमे उध्दवराव पाटील, अण्णासाहेब गव्हाणे यांच्या कार्याला या पडत्या काळात महत्त्व आहे. त्यांनीच पक्ष जिवंत ठेवण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यांचे प्रयत्न अपुरे पडत गेले.

शे.का.पक्षाने चालविलेल्या चळवळीला सातत्यपूर्णता नव्हती. वैचारिकतेबाबत एकमत नव्हते त्याचा परिणाम इतर भागावरही झाला.त्यामुळे उध्दवराव पाटील, अण्णासाहेब गव्हाणे यांच्यासारख्या अचूक बुध्दीमत्ता असणाऱ्या नेत्यांचा महाराष्ट्राला व पर्यायाने त्यांच्या जिल्ह्यालाही फायदा करून घेता आला नाही.

महाराष्ट्र पातळीवरील नेतृत्त्वाकडे उध्दवराव पाटलांचे लक्ष वाढल्याने जिल्ह्याच्या राजकारणापासून ते दूर गेले. त्यामुळे चळवळीला सातत्य राहिले नाही. पक्ष जिवंत ठेवण्यासाठी जाणीवपूर्वक कार्यक्रम चालवले पाहिजेत असे प्रयत्न जिल्ह्यात झाले नाहीत. शेतकरी , शेतमजुर नाण्याच्या दोन बाजू असल्यामुळे शे.का.प. कोणाच्या संघटना बांधू शकला नाही. तसेच शे.का.पक्षाच्या उदासीन धोरणामुळे पक्षाच्या विस्तार वाढू शकला नाही. त्यामुळेच मराठवाड्यात फक्त उध्दवराव पाटलांच्या व अण्णासाहेब गव्हाणेंच्या

कर्तृत्त्वामुळे पक्ष त्यांच्या पुरताचा मर्यादित राहिला गेला. अन्यथा उस्मानाबाद जिल्ह्यात उध्दवरावांच्या नेतृत्त्वाखाली काँग्रेसला जबर पर्याय शे.का.प.ठरला असता.

उस्मानाबाद जिल्ह्यात पक्षाला शिथिलता येण्यास कारण म्हणजे स्थापनेनंतर ज्याप्रमाणे कार्यकर्त्यांचे अभ्यावर्ग चालवले जात ते बंद पडल्याने शिथीलता येत गेली. काँग्रेसमध्ये उस्मानाबाद जिल्ह्यात खंबीर नेतृत्त्व उध्दवरावप्रमाणे नसतानाही शेतकरी कामगार पक्ष हा आपल्या मजबूत संघटना बांधू शकला नाही. वेळच्यावेळी चळवळी उभ्या केल्या नाहीत. दुसऱ्या फळीत उध्दवरावप्रमाणे खंबीर नेतृत्त्व जिल्ह्यात निर्माण होऊ शकले नाही. उध्दवरावानंतर बरीच शिथीलता पक्षाला जिल्ह्यात होत गेली. नव्याने पक्ष उभारण्याचे काम जोरात चालले आहे. तसे प्रयत्नही होत आहेत.

शे.का.प.ने संघटना, प्रभावी चळवळीह्य उभारल्या असत्या तर काँग्रेसला पर्याय ठरला असता. परंतु जाणीवपूर्वक पक्ष वाढविण्याचे प्रयत्न न होते गेल्याने व मध्यवर्ती समितीच्या धोरणांची अंमलबजावणी न केली गेल्याने उस्मानाबाद जिल्ह्यात शे.का.प.ची पीछेहाट होत गेली असे दिसून येते.

उध्दवरावांनी पक्षाचे नेतृत्त्व करण्याची क्षमता असून देखील अशा संधी सुरवातीला अनेक वेळा मिळत गेल्या. परंतु त्यांचा सौजन्यशील स्वभाव नडत गेला. त्यामुळे पक्षाला जिल्ह्यात पडझडीला तोंड द्यावे लागले. त्यांनी उमेदीच्या काळात नेतृत्त्व स्वीकारले असते तर उस्मानाबाद जिल्ह्यात नव्हे तर महाराष्ट्रात शेतकरी कामगार पक्षाला उज्वल भवितव्य उपलब्ध करुन ते देऊ शकले असते. त्यांच्याकडून झालेल्या या चुकीमुळे जिल्ह्यात कधीही न भरून न येणारी हानी झाली नसती.

उस्मानाबाद जिल्ह्यात शे.का.प.च्या पडझडीला काँग्रेसच्या नेतृत्त्वाचाही वाटा होता. यशवंतराव चव्हाण, वसंतराव नाईक, वसंतदादा पाटील ,शरदराव पवार यांच्या कौशल्यपूर्ण नेतृत्त्वाने शे.का.प. काँग्रेसला कार्यकर्ते पुरवत गेला. त्यामुळे जिल्ह्या-जिल्ह्यात पक्ष कमकुवत बनत गेला. याला उस्मानाबाद जिल्ह्याही अपवाद नव्हता असे स्पष्ट दिसून येते.

# संदर्भग्रंथसुची


**अ. प्राथमिक साधने**

१. शेतकरी कामगार पक्षाने प्रसिध्द केलेली प्रकाशने, पुस्तिका, पत्रके, परिपत्रके, मुखपत्रे, अधिवेशनातील ठराव इ.

२ शासकीय कागदपत्रे

३. शेतकरी कामगार पक्षाच्या नेत्यांची विधानसभेतील भाषणे

४ औरंगाबाद येथील उध्दवराव पाटील यांच्या सत्कारप्रसंगी केलेले त्यांचे भाषण

५ उस्मानाबाद जिल्हयातील शेतकरी कामगार पक्षामधील नेत्यांच्या कार्यकर्त्यांच्या प्रत्यक्ष घेतलेल्या मुलाखती.

६ नरसिंगराव देशमुख , उध्दवराव पाटील ,अण्णासाहेब गव्हाणे, शंकरराव धोंडगे इ. नेत्यांच्या मिळालेल्या मुलाखती.

७ उध्दवराव पाटील यांची प्रा. बा.ह.कल्याणकरांनी व भारत गर्जेद्रगडकर यांनी घेतलेल्या मुलाखती.

८. निवडणूक आयुक्तांचे प्रसिध्द झालेले निवडणूक अहवाल.

९. शिवशक्ती शेतकरी सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन यांचे जाहीर निवेदन.

## ब. दुय्यम साधने


१. शंकरराव मोरे – 'भारतीय शेतकरी कामगार पक्ष : आढावा व आराखडा,' प्रकाशक – भाई बाबासाहेब देसाई – श्री मुरारी मुद्रणालय कोल्हापूर, १३ मे १९८८

२. जगण फडणीस – 'शेतकरी कामगार पक्षाचे राजकारण' प्रकाशक – अजब, कोल्हापूर. ८ फेब्रु. १९७८

३. प्रा. ल. भा. कुरकुरे . – 'खा. शंकरराव मोरे विचार,' महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय पुणे – १४ ऑगस्ट १९९९

४. अनंतराव पाटील – शंकरराव मोरे प्रथमावृत्ती १ ऑक्टोबर १९९८

५. भा.ल.भोळे – भारतीय शेतकरी कामगार पक्ष (स्वातंत्र्य ते संयुक्त महाराष्ट्र) अप्रकाशित शोधनिबंध,नागपूर विद्यापीठ नागपूर

६. भाई बाबासाहेब देसाई बाबासाहेब– भारतीय शेतकरी कामगार पक्ष राजकारण उदरोक्त दाभाडी येथे भरलेल्या शेतकरी कामगार पक्षाच्या दुसऱ्या अधिवेशनात मंजूर झालेला ठराव, व्यंकटेश प्रिंटींग प्रेस, कोल्हापूर १८–१–१९८३

७. भगवान काळे – मराठ वाडा काल आणि आज (पूर्वाध) संकेत प्रकाशन, प्रथमावृत्ती– १० एप्रिल १९८६

८ हैद्राबाद संबंधीच्या घटना व आकडेवारी–संचालक सांख्यिकी विभाग हैद्राबाद १९५१

९ देविदास पवार –मराठवाड्यातील समाजवादी काँग्रेस: एक अभ्यास (अप्रकाशित शोधनिबंध) एम.फिल. करिता. शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर एप्रिल १९८७,

१० दिगंबरराव बिंदू – हैद्राबाद राज्याचे विसर्जन , साकेत प्रकाशन औरंगाबाद १९८६,

११. अनंत भालेराव – हैद्राबाद स्वातंत्र्य संग्राम आणि मराठवाडा, मौज प्रकाशन, मुंबई – द्वितीय आवृत्ती १ जानेवारी २००१ .

१२. स्वामी रामानंदतीर्थ – हैद्राबाद मुक्ती संग्रामाच्या आठवणी,पॉप्युलर प्रकाशन, मुंबई–१९७६

१३ केशव शंकर धोंडगे – हैद्राबाद मुक्ती लढ्यातील मन्याड खोरी विजयी, कारगील शौर्यगाथा– श्री.शिवाजी मोफत एज्युकेशन सोसायटी कंधार जानेवारी २००१

१४. जी.डी लाड .– 'पेटलेले पारतंत्र्य व धुमसते स्वातंत्र्य प्रकाशन भारती विद्यापीठ– सदाशिव पेठ पुणे, ९ ऑगस्ट १९८६,

१५ बा.ह कल्याणकर .– संघर्ष – संपादक खा.बाळासाहेब पवार.औरंगाबाद ९ ऑक्टोबर १९८३,

१६ ग.प प्रधान – स्वातंत्र्य संग्रामाचे महाभारत,साधना प्रकाशन पुणे १ ऑगस्ट १९८९

१७. सुरेश तापडिया– झुंजार सेनानी ,प्रकाशक सुरेशभाई झुं. तापडिया येडशी १२ जुलै १९८७

१८ प्रा.शहाजी पाटील –उध्दवराव पाटील विविध अंगी राजकीय नेतृत्व अप्रकाशित शोधनिबंध, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर नोव्हें १९८८

१९ प्रा.भगवाने काळे – संयुक्त महाराष्ट्र काल आणि आज, सांकेत प्रकाशन जालना, २३ जाने.१९८८

२० प्रा.डॉ.सोमनाथ रोडे – (संपा.), मराठवाडा इतिहास परिषद, औरंगाबाद निवडक शोध निबंध –खंड चौथा, लातूर डिसेंबर १९९९

२१ अनंत भालेराव – पेटलेले दिवस, श्री विद्या पुणे, १९८५.

२२. माधवराव बागल – संयुक्त आघाडी व्हायला पाहिजे, राष्ट्रवीर बेळगाव, ७ मार्च १९५२.

२३ भास्कर भाळे – यशवंतराव चव्हाण राजकारण आणि साहित्य , साकेत प्रकाशन, औरंगाबाद,१९८५

२४ यशवंतराव चव्हाण – कृष्णाकाठ, खंड.१ प्रेस्टीज प्रकाशन, पुणे १९८४

२५ दाजिबा देसाई– शेतकरी कामगार पक्ष, दाभाडी राजकीय प्रबंध, माधव प्रिंटींग प्रेस आलिबाग १९७९

२६ बाबासाहेब देसाई – भारतीय शेतकरी कामगार पक्ष–राजकारण, व्यंकटेश प्रिंटींग प्रेस , कोल्हापूर ८–१–१९८३

२७ प्रा. नरहर कुरुंदकर – हैद्राबाद विमोचन आणि विर्सजन, संपा. प्रा.द.प.जोशी

२८ य.दि फडके .– केशवराव जेधे, श्री विद्या प्रकाशन पुणे १९८२

२९ ए.बी शिंदे..– माझी कैफियत, शंकरराव मोरे, शाहू छत्रपती शिक्षण संस्था कोल्हापूर १९७९

## क. संदर्भ वृत्तपत्रे व नियतकालिके

१. अर्धसाप्ताहिक मराठवाडा– हैद्राबाद सपा. आ.कृ.वाघमारे

२. अर्धसाप्ताहिक मराठवाडा– औरंगाबाद सपा.आ.कृ.वाघमारे,अनंत भालेराव

३. दै. मराठवाडा–औरंगाबाद सं पा.अनंत भालेराव

४. श्री.ग. माजगावकर .– साप्ताहिक माणूस, ४–२–१९८७

५ प्रा.बा.ह.कल्याणकर– सुर्यपंख , युंगधर प्रकाशन,औरंगाबाद

६. प्रा.बा.ह.कल्याणकर– युगकर्ता , त्रैमासिक.

७ संग्राम – भारतीय शेतकरी कामगार पक्षाचे मुखपत्र मासिक

८ सुरेश पाटील आणि इतर–(संपा) भाई उध्दवराव पाटील विशेषांक, प्रकाशक भाई उध्दवराव पाटील जयंती महोत्सव समिती उस्मानाबाद ४ मार्च १९८९

९. जनसत्ता – पुणे

१० माणिकराव गणपतरावदेशमुख – हुतात्मा गणपतराव आनंदराव देशमुख यांच्या विषयीच्या निवडक आठवणी अर्थात स्मृतीची चाळता पाने. ५ मे १९९८

११. नरसिंगराव काटीकर गौरविका उदरोक्त नरसिंगराव काटीकर– एक दर्शन

१२. प्राचार्य रा.रं.बोराडे – प्रिय अण्णा ,स्मरणिका प्रकाशित–अमृतमहोत्सव समिती औरंगाबाद,२५ मे १९९४.

१३ महावीर जोंधळे, चक्रधर दळवी ,संपादक–अण्णासाहेब गव्हाणें मराठवाडा केसरी , भाई आण्णासाहेब गव्हाणें गौरव समारंभ विशेषांक– ५ जून १९९४ परभणी